**विषय - श्री.कृष्णा आनंद गायकवाड, सहा.विधी अधिकारी यांचे एक वर्षाच्या नियुक्तीस कार्यत्तोर मान्यता मिळणे बाबत.**
**संदर्भ - जा.क्र./भिनिशमनपा/आस्था/२७७४/२३ दि.२२/०८/२०२३.**

**प्रस्ताव :-**

विधी विभागात न्यायालयीन कामकाज पाहाण्याकरीता एक सहा.विधी अधिकारी ठोक मानधनावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत अहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार वृत्तपत्रात जाहिरात देऊन मुलाखती घेऊन निवड समिती मार्फत श्री.कृष्णा आनंद गायकवाड, यांची नियुक्ती एका वर्षाकरीता करण्यात आली आहे. त्यांच्या नेमणुकीचा कालावधी दि.२२/०८/२०२३ ते २१/०८/२०२४ पर्यन्त आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ५३ नुसार स्थायी किंवा अस्थायी नेमणुका सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधीकरीता केल्यास त्यास स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे.

श्री.कृष्णा आनंद गायकवाड, सहा.विधी अधिकारी यांची ठोक वेतनावर केलेली नियुक्तीस मा.स्थायी समितीची मान्यता घेण्याबाबत मौखिकरित्या सुचना केलेल्या आहेत. सबब, श्री.कृष्णा आनंद गायकवाड, यांच्या सहा.विधी अधिकारी पदावरील अस्थायी ठोक मानधनावर सहा महिन्यापेक्षा जास्त नियुक्ती कालावधीचे आदेश दि. २२/०८/२०२३ ते २१/०८/२०२४ पर्यन्त मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांच्या आदेशान्वये दिले असल्याने त्याबाबत महासभा/ स्थायी समितीची मान्यता मिळण्याकरीता प्रस्ताव सादर करीत आहे. सदयस्थितीत शासनाने अधिनियमातील कलम ४५२ (अ) नुसार प्रशासक नियुक्त केले असून महासभा व स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांना असून उक्त प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करणेस मान्यता मिळावी हि विनंती.

**प्रशासकीय ठराव -** ५६० **दिनांक -** १३/०९/ **२०२४.**

विधी विभागात न्यायालयीन कामकाज पाहाण्याकरीता एक सहा.विधी अधिकारी ठोक मानधनावर कंत्राटी पध्दतीने / अस्थायी नियुक्ती करण्याबाबत अहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार वृत्तपत्रात जाहिरात देऊन मुलाखती घेऊन निवड समिती मार्फत श्री.कृष्णा आनंद गायकवाड, यांची नियुक्ती एका वर्षाकरीता करण्यात आली आहे. त्यांच्या नेमणुकीचा कालावधी दि.२२/०८/२०२३ ते २१/०८/२०२४ पर्यन्त आहे.

उक्त अस्थायी नियुक्ती कालावधी सहा महिन्यापेक्षा जास्त असल्याने अधिनियमातील कलम ५३ नुसार महासभा/स्थायी समितीच्या मान्यता आवश्यक आहे. मला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, कलम ४५२ (अ) नुसार प्रशासक म्हणून महासभा/ स्थायी समितीचे अधिकार प्राप्त झाल्यानुसार श्री. श्री.कृष्णा आनंद गायकवाड,सहा.विधी अधिकारी ठोक मानधनावर दि.२२/०८/२०२३ ते २१/०८/२०२४ पर्यन्त केलेल्या नियुक्तीस मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय — शासन योजनेअंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे सन २०२३-२४ चे सुधारीत तसेच सन २०२४-२५ चा मुळ अर्थसंकल्प तयार करतांना सन २०२४-२५ करीता रु.९.०० कोटी तरतूद करणेत आली होती. मात्र दिनांक ४/९/२०२४ पर्यत रु. ८ कोटी ९४ लक्ष तरतूद खर्च झाले असून रु. ६.०० लक्ष शिल्लक आहेत. जिल्हाधिकारी नियोजन अधिकारी,ठाणे, महाराष्ट्र शासन,जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील प्राप्त पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत खालील एकूण - १० विकास कामे करण्यासाठी रुपये १६२६.२३ लक्ष इतका खर्च अपेक्षित असून शासनाचा हिस्सा ७० टक्के ( रु. ११३८.३६ लक्ष ) इतका राहणार आहे व मनपा चा ३० टक्के हिस्सा (रु.४८७.८७ लक्ष) इतका राहणार आहे. सदर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,ठाणे यांचेकडे आवश्यक त्या बाबींसह मंजूरी करीता पाठविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा़ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि.११/०९/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम (रक्कम लाखात) | दि.११/०९/२०२४ पर्यंतची शिल्लक (रक्कम लाखात) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा | रु. ९००.०० लक्ष | रु. ८९४.०० लक्ष | रु.६.०० लक्ष | |
| | एकूण | रु. ९००.०० लक्ष | रु. ८९४.०० लक्ष | रु.६.०० लक्ष | |

सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामध्ये शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामधील निधी संपला आहे. खालील कामाचे अंदाजपत्रक रु.१६२६.२३ लक्ष इतक्या रक्कमेचे आहे. मात्र शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये निधी पुरेसा नाही. खालील कामे करणे आवश्यक असल्याने खालील कामाकरीता वरील लेखाशिर्षामध्ये **बांधकाम विभागाकडील लेखाशिर्षामधून रु.३५०.०० लक्ष व आपत्कालीन विभागाच्या लेखाशिर्षामधून रु.३५.०० लक्ष व नगररचना विभागाच्या लेखाशिर्षामधून रु.२००.०० लक्ष असे एकूण रु.५८५.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करावयाचे आहे.**

**विकास कामांची नावे खालील प्रमाणे- अ.क्र. १ ते ७ (बांधकाम विभाग) व अ.क्र. ८ ते ९ (पाणीपुरवठा विभाग) व अ.क्र. १० (उदयान विभाग)**

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१३ क मधील शिवलिक पार्क ते अटलंटा ईडन वर्ल्ड रस्ता कॉक्रिटीकरण करणे. (बांधकाम विभाग) | रु.२,२२,९१,०३४/- |
| २ | भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१३ क मधील रिध्दी कॉम्प्लेक्स ते इंद्रलोक सोसायटी रस्ता कॉक्रिटीकरण करणे. (बांधकाम विभाग) | रु.७७,४८,३३३/- |
| ३ | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र.१५ पहाडी परिसरात गटार पाथवेज व पाय-या बनविणे. (बांधकाम विभाग) | रु.४९,९२,९६९/- |
| ४ | भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१३ क मधील संघवी अपार्टमेंट ते मंगलमुर्ती कॉम्प्लेक्स (एल.पी.जी) रस्ता कॉक्रिटीकरण करणे. (बांधकाम विभाग) | रु.३,१७,७६,४९९/- |
| ५ | भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१३ क येथे गटार पाथवेज दुरुस्ती तसेच पेव्हरब्लॉक व लादी बसविणे. (बांधकाम विभाग) | रु.३,४९,०६,९८५/- |
| ६ | भिवंडी निजामपूर मनपा क्षेत्रातील कै.भाऊराव धामणकर उड्डाणपुल सिटी सेंटर ते नारपोली पोलीस ठाणे पर्यत रस्त्याची व ब्रिजची (प्लास्टीक अस्फाल्टने) सुधारणा व पुर्नपृष्ठीकरण करणे. (बांधकाम विभाग) | रु.१,९९,९७,४३९/- |
| ७ | भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र.१३ क येथे अंतर्गत विविध गटार,पाथवेजव पेव्हरब्लॉक बसविणे. (बांधकाम विभाग) | २,९९,३०,५९३/- |
| ८ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.१ मधील संगमपाडा परिसरात पाण्याची लाईन बसविणे. (पाणीपुरवठा विभाग) | रु.१४,९५,१४१/- |
| ९ | भिवंडी शहरातील वार्ड क्र.१० मधील कचेरीपाडा परिसरात पाण्याची लाईन बसविणे. (पाणीपुरवठा विभाग) | रु.१४,८९,६६८/- |
| १० | भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र.१३ क अंतर्गत विविध ठिकाणी ओपन जिम बसविणे. (उदयान विभाग) | रु.७९,९४,२९५/- |
| | **एकूण** | **रु.१६,२६,२२,९५६/-** |

**खालील लेखाशिर्षामधून पुर्नविनियोजन करावयाचे आहे.**

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२४-२५ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | दि. ११/०९/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम (रक्कम लाखात) | दि. ११/०९/२०२४ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम(रक्कम लाखात) | पुर्नविनियोजना करीता घ्यावयाची रक्कम (रक्कम लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | वास्तु विशारद /तांत्रिक सल्लागार फी खर्च (बांधकाम विभाग ) | १४६.७५ | १२.२५ | १३४.५० | १२०.०० |
| २ | त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण (बांधकाम विभाग ) | ५०.०० | ११.८० | ३८.२० | २५.०० |
| ३ | महापालिका इमारत दुरुस्ती व नुतनीकरण (बांधकाम विभाग ) | ४६८.६८ | ४०१.९२ | ६६.७६ | ६५.०० |
| ४ | महापालिका कर्मचारी वसाहत देखभाल व दुरुसती (बांधकाम विभाग ) | १००.०० | २४.९८ | ७५.०२ | ५०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | आरक्षित जागांना कुंपन घालणे व भिंत बांधणे (बांधकाम विभाग ) | १००.०० | ०.०० | १००.०० | ९०.०० |
| ६ | आपत्कालीन परिस्थितीत करावा लागणारा खर्च (आपत्कालीन विभाग ) | १००.०० | ५९.७१ | ४०.२९ | ३५.०० |
| ७ | जमिन हस्तांतरीत करणे/जमिन खरेदी करणे.(नगररचना विभाग) | ५००.०० | २८७.६१ | २१२.३९ | २००.०० |
| | एकूण | रु.१४६५.४३ लक्ष | रु.७९८.२७ लक्ष | रु.६६७.१६ लक्ष | रु.५८५.०० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुर्नविनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा ो. यांच्याकडे निहीत आहेत.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत एकूण -१० कामे करणे आवश्यक आहेत, मनपा हिस्याची ३० टक्के रक्कम (रु.४ कोटी ८८ लक्ष) निधी अभावी प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे वाढीव रक्कमेसह एकूण रु.५ कोटी ८५ लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करणेकामी मुळ संचिकेसह प्रस्ताव तयार केलेला आहे. सदर कामाकरीता मा.प्रशासक तथा आयुक्त सा ो. यांनी पुर्नविनियोजन करणेस दि. /०९/२०२४ रोजी मान्यता दिलेले आहेत. त्या अनुषंगाने शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये रु.५ कोटी ८५ लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे.

त्यास दिनांक /०९ /२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** ५६७ **दिनांक** २६**/ ०९ /२०२४**

जिल्हा नियोजन अधिकारी,ठाणे, महाराष्ट्र शासन,जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील प्राप्त पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत एकूण- १० विकास कामे करण्यासाठी रुपये १६२६.२३ लक्ष इतका खर्च अपेक्षित असून शासनाचा हिस्सा ७० टक्के ( रु. ११३८.३६ लक्ष ) इतका राहणार आहे व मनपा चा ३० टक्के हिस्सा (रु.४८७.८७ लक्ष ) इतका राहणार आहे. सदर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,ठाणे यांचेकडे आवश्यक त्या बार्बीसह मंजूरी करीता पाठविणे आवश्यक आहे. मात्र निधी अभावी प्रलंबित आहे. शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये निधी पुरेसा नाही. इतर कामांकरीता देखील या लेखाशिर्षामध्ये निधीची आवश्यकता असल्यामुळे काही प्रस्ताव तरतूद अभावी प्रलंबीत आहेत. सदर लेखाशिर्षामध्ये वाढीव रु.५ कोटी ८५ लक्ष निधीचे पुर्नविनियोजन करणे गरजेचे आहे. तरी वरील ७ लेखाशिर्षामधून शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये एकूण रु.५ कोटी ८५ लक्ष वाढीव निधीसह पुर्नविनियोजनाने वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :-

विषय :- प्रभाग क्र. १७ मधील पद्मानगर येथील अखिल पद्मशाली समाज समोर घर नं. १०९ म्याना बिल्डींग ते एव्हरग्रीन बिल्डींग पर्यंत जुना नाला तोडून नवनि नाला व नाल्यावर स्लॅब टाकणे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्रं. ०३ कार्यक्षेत्रात **प्रभाग क्र. १७ मधील पद्मानगर येथील अखिल पद्मशाली समाज समोर घर नं. १०९ म्याना बिल्डींग ते एव्हरग्रीन बिल्डींग पर्यंत जुना नाला तोडून नवनि नाला व नाल्यावर स्लॅब टाकणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४९,९९,८७६/-) या कामाची बी-१ प्रकारची व्दितीय ई-निविदा मागविण्यात आली होती. सदर कामाची निविदा सुचना क्रं. २०८/२०२३-२४ (टेंडर क्र. १०३५०४९) वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन मागविणेत आली आहे. सदर कामासाठी एकुण एक ई निविदा प्राप्त झालेली असुन, पात्र निविदाकार **मे. सुजित बाळासाहेब खरात, भिवंडी.** यांनी दिलेला देकार अंदाजपत्रकीय दराने असुन, त्यानुसार कामाची रक्कम रु. ४९,९९,८७६/- (**GST** सह) येत आहे.

**मे. सुजित बाळासाहेब खरात, भिवंडी.** यांची ई निविदा रक्कम रु. ४९,९९,८७६/- (अक्षरी रु. एकोणपन्नास लाख नव्व्यान्नव हजार आठशे शहात्तर रुपये मात्र) (GST सह) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामीच्या प्रस्तावास प्र. शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक १५/०७/२०२४ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय ठराव मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रं. : ५६२

दिनांक :- १६/०९/२०२४

प्रभाग समिती क्रं. ०३ कार्यक्षेत्रात **प्रभाग क्र. १७ मधील पद्मानगर येथील अखिल पद्मशाली समाज समोर घर नं. १०९ म्याना बिल्डींग ते एव्हरग्रीन बिल्डींग पर्यंत जुना नाला तोडून नवनि नाला व नाल्यावर स्लॅब टाकणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४९,९९,८७६/-) कामी पात्र निविदाकार **मे. सुजित बाळासाहेब खरात, भिवंडी.** यांची अंदाजपत्रकीय दराची म्हणजेच रक्कम रु. ४९,९९,८७६/- (अक्षरी रु. एकोणपन्नास लाख नव्व्यान्नव हजार आठशे शहात्तर मात्र) (**GST** सह) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता,मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखा व वित्त अधिकरी व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, वरिल नमुद कामाचे पात्र निविदाकार मे. **सुजित बाळासाहेब खरात, भिवंडी.** यांचे बरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :-

**विषय :- प्रभाग क्रं. १७ मधील पद्मानगर वॉटरवर्क्स कंपाऊंड येथे समाज केंद्र तयार करणे.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्रं. ०३ कार्यक्षेत्रात **प्रभाग क्रं. १७ मधील पद्मानगर वॉटरवर्क्स कंपाऊंड येथे समाज केंद्र तयार करणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३७,५०,९९४/-) या कामाची बी-१ प्रकारची ई-निविदा मागविण्यात आली होती. सदर कामाची निविदा सुचना क्रं. ११/२०२४-२५ (टेंडर क्र. १०५४१६५) वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन मागविणेत आली आहे. सदर कामासाठी एकुण दोन ई निविदा प्राप्त झालेल्या असुन, पात्र निविदाकार **मे. सुशिल लक्ष्मण गायकवाड, भिवंडी.** यांनी दिलेला देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२२ टक्के कमी दराने असुन, त्यानुसार कामाची रक्कम रु. ३७,४२,७४२/- (**GST** सह) येत आहे.

**मे. सुशिल लक्ष्मण गायकवाड, भिवंडी.** यांची ई निविदा रक्कम **रु. ३७,४२,७४२/-** (अक्षरी रु. सदोतीस लाख बेचाळीस हजार सातशे बेचाळीस रुपये मात्र) (GST सह) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामीच्या प्रस्तावास प्र. शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त आधिकारी मुख्य लेखापरिक्षक तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक २०/०८/२०२४ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय ठराव मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

दिनांक :- 96/09/२०२४

ठराव क्रं. : 463

प्रभाग समिती क्रं. ०३ कार्यक्षेत्रात **प्रभाग क्रं. १७ मधील पद्मानगर वॉटरवर्क्स कंपाऊंड येथे समाज केंद्र तयार करणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३७,५०,९९४/-) कामी पात्र निविदाकार **मे. सुशिल लक्ष्मण गायकवाड, भिवंडी.** यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२२ टक्के कमी दराची म्हणजेच रक्कम **रु. ३७,४२,७४२/-** (अक्षरी रु. सदोतीस लाख बेचाळीस हजार सातशे बेचाळीस मात्र) (**GST** सह) ची निविदा मंजुरीस प्र. शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, वरिल नमुद कामाचे पात्र निविदाकार **मे. सुशिल लक्ष्मण गायकवाड, भिवंडी.** यांचे बरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :-

**विषय :- प्रभाग क्रं. १७ मधील पद्मानगर वॉटरवर्क्स कंपाऊंड येथे वाचनालय (अभ्यासिका) तयार करणे.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्रं. ०३ कार्यक्षेत्रात **प्रभाग क्रं. १७ मधील पद्मानगर वॉटरवर्क्स कंपाऊंड येथे वाचनालय (अभ्यासिका) तयार करणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ८४,६६,९३९/-) या कामाची बी-१ प्रकारची ई-निविदा मागविण्यात आली होती. सदर कामाची निविदा सुचना क्रं. ११/२०२४-२५ (टेंडर क्र. १०५४१९१) वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन मागविणेत आली आहे. सदर कामासाठी एकुण दोन ई निविदा प्राप्त झालेल्या असुन, पात्र निविदाकार मे. **सुशिल लक्ष्मण गायकवाड, भिवंडी.** यांनी दिलेला देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२१ टक्के कमी दराने असुन, त्यानुसार कामाची रक्कम रु. ८४,४९,१५८/- (**GST** सह) येत आहे.

**मे. सुशिल लक्ष्मण गायकवाड, भिवंडी.** यांची ई निविदा रक्कम रु. ८४,४९,१५८/- (अक्षरी रु. चौऱ्याऐंशी लाख एकोणपन्नास हजार एकशे अठ्ठावन्न रुपये मात्र) (GST सह) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामीच्या प्रस्तावास प्र. शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त आधिकारी मुख्य लेखापरिक्षक तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक २३/०८/२०२४ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय ठराव मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रं. : ५६४ दिनांक :- १६/०९/२०२४

प्रभाग समिती क्रं. ०३ कार्यक्षेत्रात **प्रभाग क्रं. १७ मधील पद्मानगर वॉटरवर्क्स कंपाऊंड येथे वाचनालय (अभ्यासिका) तयार करणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ८४,६६,९३९/-) कामी पात्र निविदाकार **मे. सुशिल लक्ष्मण गायकवाड, भिवंडी.** यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२१ टक्के कमी दराची म्हणजेच रक्कम रु. ८४,४९,१५८/- (अक्षरी रु. चौऱ्याऐंशी लाख एकोणपन्नास हजार एकशे अठ्ठावन्न रुपये मात्र) (**GST** सह) ची निविदा मंजुरीस प्र. शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, वरिल नमुद कामाचे पात्र निविदाकार मे. **सुशिल लक्ष्मण गायकवाड, भिवंडी.** यांचे बरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका